महाराष्ट्र शासन
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक : १४४२(१)(३)/२०२२/तेवीस दिनांक : ११ ऑगस्ट, २०२३

**-: प्रसिध्दीपत्रक :-**

**विषय :- महाराष्ट्र दुय्यम सेवा, अराजपत्रित गट-ब संयुक्त पूर्व परीक्षा - २०२२**
सहायक कक्ष अधिकारी, राज्य कर निरीक्षक, पोलीस उपनिरीक्षक व दुय्यम निबंधक (श्रेणी-१)/मुद्रांक निरीक्षक संवर्गाच्या सुधारित निकालाबाबत.

**संदर्भ :-** **१.** जाहिरात क्रमांक ५३/२०२२
**२.** दिनांक ०५ व ०६ जुलै, २०२३ रोजीची प्रसिध्दीपत्रके.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत शनिवार दिनांक ०८ ऑक्टोबर, २०२२ रोजी आयोजित महाराष्ट्र दुय्यम सेवा, अराजपत्रित गट-ब संयुक्त पूर्व परीक्षा - २०२२ करीता सहायक कक्ष अधिकारी, पोलीस उपनिरीक्षक, राज्य कर निरीक्षक व दुय्यम निबंधक (श्रेणी-१)/मुद्रांक निरीक्षक या संवर्गासाठी विकल्प दिलेल्या उमेदवारांमधून प्रस्तुत मुख्य परीक्षेसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांचा निकाल अनुक्रमे दिनांक ०५ व ०६ जुलै, २०२३ रोजी जाहीर करण्यात आला होता.

**२.** प्रस्तुत परीक्षेत ज्या उमेदवारांनी त्यांच्या प्रोफाईल/आवेदन अर्जामध्ये खेळाडू म्हणून Eligible for Group या रकान्यामध्ये Group C व D हा पर्याय निवडला. परंतु राज्यस्तरीय खेळाडू म्हणून फक्त गट-क व गट-ड या संवर्गांच्या पदांसाठी पात्र असतानाही त्यांची विषयांकित परीक्षेच्या निकालात गट-ब करीता पात्र नसताना त्यांना पात्र ठरविण्यात आले असल्यामुळे उपरोक्त चारही संवर्गांचा निकाल दिनांक ११ ऑगस्ट, २०२३ रोजी सुधारित करण्यात आला आहे. प्रस्तुत संवर्गाकरीता पूर्व परीक्षेत अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांच्या बैठक क्रमांकासह नावाची यादी व गुणांची सीमारेषा आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

**३.** प्रस्तुत पूर्व परीक्षेच्या निकालातून मुख्य परीक्षेसाठी पात्र करण्यात आलेल्या तृतीयपंथी उमेदवारांना, तृतीयपंथी व्यक्तींच्या आरक्षणासंदर्भातील शासनाच्या धोरणाच्या अधीन राहून तात्पुरता प्रवेश देण्यात आला आहे.

**४.** उमेदवारांनी ऑनलाईन पद्धतीने केलेल्या अर्जात दिलेल्या माहितीच्या आधारे, त्यांची पात्रता तपासण्याच्या अटीच्या अधीन राहून, पूर्व परीक्षेच्या निकालाआधारे मुख्य परीक्षेस पात्र ठरलेल्या उमेदवारांपैकी मुख्य परीक्षेसाठी विहित कालावधीत अर्ज करणाऱ्या तसेच परीक्षा शुल्क भरणाऱ्या अर्हताप्राप्त उमेदवारांनाच मुख्य परीक्षेस प्रवेश देण्यात येईल.

**५.** आवश्यक तपासणीनुसार अपात्र ठरणाऱ्या उमेदवारांची उमेदवारी आयोगाकडून कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

**६.** प्रस्तुत परीक्षेचा निकाल आरक्षणाच्या/समांतर आरक्षणाच्या मुद्यांसंदर्भात विविध मा. न्यायालयात/मा. न्यायाधिकरणात दाखल न्यायिक प्रकरणातील अंतिम निर्णयाच्या अधीन राहून प्रसिद्ध करण्यात आला आहे.

**७.** मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र उमेदवाराने ऑनलाईन पद्धतीने आवश्यक माहिती तसेच परीक्षा शुल्क विहित मुदतीत विहित पद्धतीने सादर करणे आवश्यक राहील. त्याशिवाय उमेदवारास मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येणार नाही. तसेच, पूर्व परीक्षेसाठी सादर केलेल्या अर्जातील दावेच मुख्य परीक्षेकरीता स्वीकारार्ह ठरतील.

उप सचिव (परीक्षोत्तर) (अ.प.)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

ठिकाण : नवी मुंबई.